Vol 3 Issue 4 May 2013

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue. 4, May. 2013
ISSN:-2230-7850
Available online at www.isrj.net
ORIGINAL ARTICLE

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचा सहभाग

**तुकाराम नारायण शिंदे**

इतिहास विभाग , अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालय,सोलापूर.

*सारांशः*

भारतीय स्वातंत्र्य चळवळ अनेक दृष्टीने नाविण्यपुर्ण ठरली होती. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ज्या–ज्या घटकांनी भाग घेतला होता. त्यामध्ये महिलांचाही सहभाग उल्लेखनीय होता. तत्कालिन स्थितीत भारतीय महिला अनेक बंधनांनी जखडलेली हाती. परंपरेमध्ये अडकली होती. तरीही भारतीय स्वातंत्र्य चळवळ ज्या वेगवेगळ्या टप्पातून जात होती. जे वेगवेगळे प्रवाह निर्माण झाले होते. यामध्ये भारताच्या स्वातंत्र्यासाठी महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला होता.

*प्रस्तावना :*

**१८८५ ते १९०५ या काळातील स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचा सहभाग**

१९ वे शतक महिलांच्या दृष्टीने फार उपयुक्त ठरले. या शतकात देशामध्ये अनेक समाजसुधारक महिलांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी झगडत होते. महिलांच्या शिक्षणाला प्रारंभ झाला होता. १९व्या शतकात अखेरीस इ.स. १८८५ मध्ये अखिल भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना झाली होती. इ. स. १८८५–१९०५ याकाळात राष्ट्रीय सभेने ब्रिटिशाकडे स्वराज्य मागण्यापेक्षा सुधारणा मागण्यावर भर दिला होता. अर्थात राष्ट्रीय सभेचे हे धोरण तत्कालीन परिस्थितीची गरज होती. याकाळात राष्ट्रीय सभेच्या कार्यात महिलांचा सहभाग संख्येने जास्त नव्हता. मात्र काही महिला राष्ट्रीय सभेच्या वार्षिक अधिवेशनात हजर राहत होत्या. इ.स. १९०० मध्ये राष्ट्रीय सभेची अधिवेशन लाहोर येथे भरले होते. एन.जी.चंदावरकर अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी होते. इ.स. १९०० च्या या लाहोर अधिवेशनास बंगालमधील रविंद्रनाथ टागोर यांच्या भगिनी स्वर्णकुमारी देवी आणि श्रीमती कांदबिनी गांगुली या महिला उपस्थित होत्या. श्रीमती कांदबिनी गांगुली यांनी या अधिवेशनाच्या व्यासपीठावरुन भाषण केले होते. पुढे स्वर्णकुमारी देवी यांची मुलगी सरलादेवी यांनी राजकीय कार्यात भाग घेतला होता. त्यांनी स्वदेशी मालाचे दुकान ही चालविले होते.

इ.स.१९०५ मध्ये ब्रिटिशांनी प्रशासनाची सोय या गोंडस नावाखाली बंगाल प्रातांची फाळणी केली. तेव्हा भारतीयांनी वंग–भंग विरोधी चळवळ सुरू केली. स्वदेशी व बहिष्कार चळवळ हाती घेतली. महिलांनीही या चळवळीत भाग घेतला. मोर्चे, निदर्शने व मिरवणुकीत सक्रीय सहभाग नोंदविला होता.

**इ.स.१९०५ ते १९२० या काळातील स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचा सहभाग**

ब्रिटिशांनी इ.स.१९०५ मध्ये बंगाल प्रांताची केलेली फाळणी भारतीय स्वातंत्र्य चळवळीला आक्रमक व जहाल स्वरूप देण्यास कारणीभूत ठरली. बंगाल फाळणीविरोधी वंग–भंग विरोधी चळवळ झाली होती यामध्ये महिला सक्रीय सहभागी झाल्या होत्या. विशेषत: बंगाल व महाराष्ट्रामध्ये यावेळी जी स्वदेशी व बहिष्कार चळवळ सुरू झाली होती. त्यामुळे या दोन प्रांतातील महिलांनी विदेशी बांगड्या व काचेच्या वस्तु वापरणे बंद केले. यानंतरच्या काळातच क्रांतीकारकांच्या कारवाया वाढल्या.

इ.स.१९०५ ते १९२० या कालावधीमध्ये भारताच्या स्वातंत्र्यासाठी क्रांतीकारकांनी केलेल्या कारवाया व जहालमतवादयांचे कार्य यामध्ये महिलांचाही सहभाग होता. याकाळात कुमुदिनी मित्तर, सिस्टर निवेदिता (स्वामी विवेकानंदाच्या शिष्या) तसेच पंजाबमधील सुशीलादेवी या महिला क्रांतीकारकांशी गुप्तरित्या संपर्क ठेवून होत्या. क्रांतीकारकांना मदत करीत होत्या. याकाळात भारतीय क्रांतीकारकांचे परदेशातूनही कार्य चालू होते. या कार्यातही महिलांचा सहभाग होता. श्यामजी कृष्ण वर्मा यांच्या पत्नी, तसेच दादाभाई

नौरोजींची नात खुर्शीदबेन आणि बयकाजी रुस्तुम कामा या महिला पुरूषांच्या बरोबरीने तिथे कार्य करीत होत्या. यापैकी श्रीमती कामा यांनी स्टटगार्ट येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत स्वतंत्र भारताचा ध्वज फडकावला होता. त्याचबरोबर ब्रिटीशांनी भारताचे जे शोषण चालविले होते. त्याचे चित्र आपल्या भाषणातून रेखाटले होते.

श्रीमती डॉ. ॲनी बेंझट यांचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग होता. ॲनी बेंझट मुळच्या आयर्लंडमधील होत्या. इ.स.१८९३ मध्ये त्या भारतात आल्या होत्या. भारतीय संस्कृती व भारतीय लोक यांच्या ॲनी बेंझट चाहत्या होत्या. इ.स.१९०७ मध्ये भारतातील थिऑसॉफिकल सोसायटीचे अध्यक्षपद त्यांच्याकडे आले होते. भारतीयांनां भरीव राजकीय हक्क प्राप्त झाल्याशिवाय भारताची कोणत्याच क्षेत्रात प्रगति होणार नाही. याबाबत त्यांची खात्री पटली होती. भारताच्या स्वातंत्र्यासाठी सर्व शक्ती खर्च करण्याचे त्यांनी ठरविले होते. इ.स.१९१३ मध्ये त्यांनी राष्ट्रीय सभेचे सभासदत्व स्वीकारले होते. डॉ.ॲनी बेंझट पुढील काळात अल्पावधीमध्ये भारतीय राजकारणात आघाडीवर आल्या होत्या. भारतात आयर्लंड प्रमाणेच होमरुल लीग सुरू करावी असा त्यांच्या विचार होता. डॉ.ॲनी बेंझट यांनी तशी सुचना इ.स.१९१५च्या राष्ट्रीय सभेच्या मुबंई येथील अधिवेशनात मांडली होती. पुढे लोकमान्य टिळकांनी २८ एप्रिल १९१६ रोजी पुणे येथे होमरुल लीगची स्थापना केली. तर डॉ.ॲनी बेंझट यांनी मद्रास येथे होमरुल लीगची स्वतंत्र शाखा सुरू केली. डॉ. ॲनी बेंझट यांनी यानंतरच्या काळात स्वराज्याबाबत जनतेत जागृती घडून यावी यासाठी ठिकठिकाणी व्याख्याने दिली. डॉ. ॲनी बेंझट यांच्या कार्याचा प्रभाव पुढे सतत वाढत गेला. परिणामी इ.स. १९१७ च्या कलकत्ता येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद डॉ. ॲनी बेंझट यांना मिळाले होते. मात्र भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधी यांच्याकडे जाताच डॉ. ॲनी बेंझट मागे पडत गेल्या.

**इ.स.१९२० ते १९४७ याकाळातील भारतीय स्वातंत्र्य चळवळीमधील महिलांचा सहभाग**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासामध्ये इ.स. १९२० ते १९४७ हा कालावधी गांधीयुग म्हणून ओळखला जातो. महात्मा गांधीच्या असहकार चळवळ, (१९२०) सविनय कायदेभंग चळवळ (१९३०) व चले जाव चळवळ (१९४२) या तीन चळवळीने हा कालावधी भारावून गेलेला होता. महात्मा गांधीनी या तीनही चळवळीत महिलांना सहभागी करून घेतले होते.

महात्मा गांधीजींचा महिलाकडे पाहण्याचा दृष्टिकोन पुर्णपणे आधुनिक होता. महिलांना दुबळे मानणे ही एक ढोबळ चुकच नाही तर घोर पातक आहे. महिलांना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाची संधी दिली पाहिजे असे त्यांचे मत होते. महात्मा गांधी यांनी महिलाविषयी केवळ विचार मांडले नाहीत तर प्रत्यक्षात महिलामधील न्यूनगंडाची भावना नष्ट करणे व त्यांच्यातील सुप्तशक्ती जागृत करणे यावर भर दिला होता. महात्मा गांधीजीच्या महिला सामाजिक व राजकीय कार्य करण्यास प्रेरित झाल्या होत्या. महात्मा गांधीनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी ज्या चळवळी केल्या त्यामध्ये महिला सक्रीयपणे सहभागी झाल्या होत्या.

महात्मा गांधीजीनी भारतात इ.स. १९१७ मध्ये प्रथम बिहारमधील 'चंपारण्य' येथे सत्याग्रह केला.चंपारण्य जिल्हयात युरोपीयनच्या निळीच्या मळ्यात भारतीय मजूरावर प्रंचड जुलूम, अत्याचार केले जात होते. त्यांना हालअपेष्टा सहन कराव्या लागत होत्या. महात्मा गांधीजींनी येथील परिस्थितीची माहिती मिळताच ते चंपारण्य जिल्हयातील निळीच्या मळ्यातील मजूरांना न्याय मिळवून देण्यासाठी सत्याग्रह केला. महात्मा गांधीजींच्या चंपारण्य येथील सत्याग्रहमध्ये ज्या महिला सहभागी झाल्या होत्या. त्यामध्ये महाराष्ट्रातील आनंदी वैशपायन आणि अवंतिकाबाई गोखले या दोन महिला होत्या यापैकी भारताच्या स्वातंत्र चळवळीमधील महात्मा गांधी यांची पहिली भारतीय शिष्या म्हणून अवंतिकाबाई गोखले यांना ओळखले जाते इ.स. १९१६ मध्ये महात्मा गांधी व अवंतिकाबाई गोखले यांची भेट लखनौ येथे राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनामध्ये झाली होती. पुढे त्या अवंतिकाबाई गोखले या कुटुबांची जबाबदारी सांभाळत, अपंग पती बबनराव गोखले यांचा सांभाळ करीत महात्मा गांधी यांच्या चळवळीमध्ये सहभागी होत राहिल्या.

चंपारण्य सत्याग्रहाप्रसंगी त्या तिथे गेल्या तेव्हा त्यांनी बिहारमध्ये फिरून महिलांना आरोग्याचे धडे दिले. महिलांच्या शिक्षणासाठी प्रचार केला. बडहरवा गावी मुलांची शाळा सुरू केली. चंपारण्य येथे मराठी भाषेतील पहिले महात्मा गांधीजीचे चरित्र लिहायला प्रारंभ केला.पुढे इ.स. १९१९ मध्ये नाशिक येथील सभेत त्यांनी भाषण केले. अवंतिकाबाईचे भाषण ऐकून लोकमान्य टिळक प्रभावित झाले. यामुळे ते उत्स्फूर्तपणे म्हणाले की,''महाराष्ट्राची सरोजिनी आता तयार झाली आहे.''

महात्मा गांधीजीनी इ.स.१९१९ मध्ये असहकार चळवळ सुरु केली होती. या चळवळीसाठी स्वंयसेविकेची पथके तयार केली होती. असहकार चळवळीमध्ये महात्मा गांधीजींनी आयोजित केलेल्या. स्वदेशी, बहिष्कार, खादीचा प्रचार, सुतकमाई, मद्यपान विरोधी प्रचार, परदेशी मालाची होळी आणि निरोधने या उपक्रमात अनेक महिला सहभागी झाल्या होत्या. देशबंधू चित्तरंजन दास यांची पत्नी वासंतीदेवी भगिनी उर्मिला देवी आणि इंद्रप्रभा मुजुमदार यांनी विधायक कार्यासाठी महिला मंडळे स्थापन केली होती. वासंतीदेवी यांनी इ.स.१९२१ मध्ये सत्याग्रहीच्या पथकाचे नेतृत्व केले होते इ.स. १९२२ मध्ये चित्तगांव येथे भरलेल्या प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्षपद भुषविले होते. याशिवाय भारतातील इतर प्रांतातूनही महिला महात्मा गांधीजींच्या असहकार चळवळीच्या निमित्ताने भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभागी होत होत्या. पंजाबमध्ये लाला लजपतराय यांच्या पत्नी राधादेवी,मुलगी पार्वतीदेवी, गुजरातमध्ये मनिबेन पटेल, संयुक्त प्रांतात पंडित नेहरु यांच्या मातोश्री स्वरुपाराणी व पत्नी कमला नेहरु आणि लखनौमधील कादिर, लाहोर येथील बाई अम्मान या मुस्लिम महिला इ. महिला महात्मा गांधीजींच्या या चळवळीमध्ये सहभागी झाल्या होत्या.

महात्मा गांधीजीनी १२ मार्च १९३० रोजी दांडी यात्रेला प्रारंभ करुन सविनय कायदेभंग चळवळ सुरु केली होती. महात्मा गांधीजीच्या या चळवळीमध्ये महिला सहभागी झाल्या होत्या अवंतिकाबाई गोखले यांनी महिलांची सर्वांगीण उन्नती व्हावी, त्यांना एकत्र आणून त्यांचा व्यक्तिविकास व सबलीकरण व्हावे या हेतूने गिरगाव येथे हिन्द महिला समाज ही संस्था स्थापन केली होती. त्यांनी हिन्द महिला हे साप्ताहिक सुरु केले होते. इ.स. १९३० व १९३२ मध्ये मिठाच्या सत्याग्रहासाठी मुबंईहून शेकडो महिला सामील झाल्या होत्या.

२६ ऑक्टोबर १९३० रोजी पोलिस कमिशनरचा हुकुम मोडून अवंतिकाबाई गोखले यांनी मुंबईच्या आझाद मैदानावर झेंडावंदन केले होते. तत्पूर्वी त्यांनी महिलांचा मोर्चा काढला होता. या मोर्चा प्रसंगी कृष्णकुमारी सरदेसाई या १३-१४ वर्षाच्या मुलीच्या हातात झेंडा होता. ब्रिटिशांनी तिला मारहण केली पण तिने झेंडा सोडला नव्हता २७ ऑक्टोबर १९३० रोजी अवंतिकाबाई गोखले यांना अटक झाली व त्यांना सहा महिन्याची शिक्षा झाली. सविनय कायदेभंग चळवळीच्या काळात सत्याग्रहाची योजना व अंमलबजावणी करण्यासाठी युध्द समिति स्थापन करण्यात आली होती. या युध्द समितीच्या १३ व्या तुकडीच्या अवंतिकाबाई गोखले प्रमुख होत्या. यावेळी त्यांचे पती प्रचंड आजारी होते. यामुळे अवंतिकाबाईनी प्रत्यक्ष सत्याग्रह करण्याऐवजी बाहेर राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करावे असे महात्मा गांधीजींनी सुचविले. पण युध्द समितीच्या प्रमुखाने सत्याग्रह न करणे नैतिकतेला धरुन होणार नाही असे सांगून त्यांनी सत्याग्रह करण्याचे ठरविले. त्यांनी इतर महिलांसोबत हातात काळे झेंडे घेऊन फडकावले तेव्हा ब्रिटिशांनी त्यांना पकडून भांडुपच्या जंगलात सोडले. त्यांनी २७ ऑक्टोबर १९३२ रोजी पत्रक काढून याच निषेध केला तेव्हा त्यांच्यावर खटला भरण्यात आला. यावेळी अवंतिकाबाई गोखले यांना ४०० रुपये दंड व दोन महिने तुरुंगवास अशी शिक्षा ठोठावण्यात आली

इ.स. १९२५ च्या कानपूर येथील अखिल भारतीय राष्ट्रीय सभेचे अध्यक्षपद भुषविणाऱ्या पहिल्या भारतीय महिला सरोजिनी नायडू याही सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग झाल्या होत्या. सरोजिनी नायडू यांना धारासना सत्याग्रह प्रसंगी स्वंयसेविकांच्या पथकाचे नेतृत्व केले होते. याप्रसंगी त्यांनी ब्रिटिशांचा लाठीमार झेलला व तुरुंगवासही भोगला. याचकाळात कमलादेवी यांनीही महिलांचे राजकीय प्रबोधन घडवून आणले तरुणांची संघटना बांधण्यात महत्वाची भुमिका बजावली.

याशिवाय सविनय कायदेभंग चळवळीमध्ये दिल्लीसारख्या जुन्या मताच्या शहरातही राजकीय निदर्शनाबद्दल १६०० स्त्रियांना अटक झाली होती. सविनय कायदेभंग चळवळीबाबत ब्रिटिश निरिक्षकाने लिहून ठेवले आहे की, '' सविनय कायदेभंगच्या चळवळीने दुसरे काही मिळवले असो की नसो, पण भारतीय स्त्रियांच्या सामाजिक उध्दाराला तिने फार मोठा हातभार लावला एवढे निश्चित स्त्रियांच्या उध्दारासाठी ७५ वर्ष समाज सुधारणेची चळवळ जे करु शकली नाही ते या चळवळीने काही आठवडयात मिळवले.''

इ.स.१९३२-१९४२ हा दहा वर्षाच्या काळात भारतीय स्वातंत्र्यासाठी मोठ्या चळवळी झाल्या नाहीत. मात्र याचकाळात भारताची घटनात्मक वाटचाल सुरु झाली. राष्ट्रीय सभा जनजागृतीवर भर देत होती. क्रांतिकारकांच्या कारवायांना नव्याने जोम प्राप्त झाला होता. याचकाळात इ.स.१९३४ मध्ये कमलादेवी यांनी कॉंग्रेस समाजवादी गटाचे नेतृत्व स्वीकारले होते इ.स.१९३६ मध्ये अखिल भारतीय राष्ट्रीय सभेचे खेडयातील पहिले अधिवेशन सध्याच्या जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथे भरले होते. फैजपूर अधिवेशनामध्ये अवंतिकाबाई गोखले यांच्या नेतृत्वाखाली हिन्द महिला समाज या संस्थेचा महिलांचा मोठा गट उपस्थित होता. फैजपूर अधिवेशनात अवंतिकाबाईनी खादी विक्रीची जबाबदारी उचलली होती. त्यांनी चार-पाच दिवसात हजारो रुपयांची खादीची विक्री केली होती. इ.स.१९३२-१९४२ दरम्यान मुंबई प्रांतात खुर्शीदबेन, लीलावती मुन्सी, हंसा मेहता, बंगालमध्ये लतिका घोष, अरुणवाला सेन, उर्मिलादेवी या महिलांनी महिला राष्ट्रीय संघ, नारी सत्याग्रह समिती यासारख्या संघटनामार्फत भारतीय महिलांना स्वातंत्र्य चळवळीकडे आकृष्ट केले होते.

याचकाळात भारतीय क्रांतीकारकांच्या ब्रिटिशाविरोधी कारवाया सुरु होत्या. बंगाल प्रांतात सुर्यसेन या तरुण क्रांतिकारकाने चितगाव जिल्ह्यात क्रांतिकारी संघटना स्थापन केली होती.

याकाळातील बंगाल प्रांताच्या क्रांतिकारी चळवळीचे मुख्य वैशिष्ट म्हणजे सुशिक्षित तरुण मुलींचा त्यामधील सहभाग हे होय. सुर्यसेन यांच्या क्रांतिकारी कार्यात प्रीतिलता वडेडार व कल्पना दत्त या तरुण मुली सहभागी झाल्या होत्या. सुर्यसेन यांच्या क्रांतिकारी कार्यात १८ एप्रिल १९३० रोजी चितगाव शस्त्रागारावरील हल्ला ही घटना अतिशय महत्वाची ठरली.

चितगाव शस्त्रागारावरील हल्ल्याची योजना त्यांनी यशस्वीपणे पार पाडाली. सुर्यसेन यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र भारताचे सरकार स्थापन झाल्याची घोषणाही झाली परंतु ब्रिटिशांना या सर्व घटनाक्रमाचा सुगावा लागताच सुर्यसेन व त्यांच्या क्रांतिकारी सहकाऱ्यांना डोंगरचा आश्रय घेऊन ब्रिटिशाशी लढावे लागले. पुढे शत्रू पुढे आपला टिकाव लागणार नाही हे जाणवताच त्यांनी अनेक गटात विभागून ब्रिटिशाबरोबर गनिमी युध्द सुरु केले. पण या गनिमीयुध्दात सुर्यसेनचे अनेक सहकारी मारले गेले. जे पोलिसांच्या हाती लागले त्यांच्यावर जुलै १९३० मध्ये खटला भरण्यात आला. मात्र सुर्यसेन व त्यांच्या उरलेल्या सहकाऱ्यांनी ब्रिटिशविरोधी लढा चालूच ठेवला. युरोपीयन लोक हेच त्यांचे याकाळात लक्ष्य होते. सप्टेंबर १९३२ मध्ये चितगाव येथील रेल्वे क्लबमध्ये युरोपीयन व अँग्लोइंडियन पुरुष व महिला नाचगाण्यात मशगुल होते तेव्हा प्रीतिलता वडेडार हिने आपल्या सहकाऱ्यासह या रेल्वे क्लबवर हल्ला केला, एकाएकी बॉम्बस्फोट गोळ्यांचा आवाज ऐकून रेल्वे क्लबमधाल सर्व मंडळी गांगारुन गेली. काहींनी पिस्तुल काढून क्रांतिकारकांच्या हल्ल्याचा प्रतिकार करण्याच प्रारंभ केला होता. यावेळी दोन्ही बाजुने होत असलेल्या गोळीबारात एक युरोपीय महिला ठार झाली व अनेक लोक जखमी झाले. प्रीतिलता वडेडार हिलाही गोळी लागली पण जखमी अवस्थेत पोलिसांच्या हाती पडून विटबंना होऊ नये म्हणून तिने सायनाईड खाऊन मृत्यूला कवटाळले. पुढे १२ जानेवारी १९३४ रोजी सुर्यसेनलाही पकडून फाशी देण्यात आली. याशिवाय बंगाल प्रांतातील शांती घोष, सुनिती चौधरी, बीना दास व शोभाराणी दत्त या तरुणीही क्रांतिकारी कार्यात सहभागी झाल्या होत्या. यापैकी शांती घोष आणि सुनिती चौधरी या हायस्कूलमध्ये शिकणाऱ्या मुलीनी २४ डिंसेबर १९३१ रोजी जिल्हा मॅजिस्ट्रेट स्टिव्हन्स याची त्याच्या घरात घुसून हत्या केली होती. कलकत्ता विदयापीठाच्या इ.स. १९३२ च्या दीक्षांत समारंभ प्रसंगी बंगाल प्रांताचा गव्हर्नर जॅक्सन याचे भाषण सुरु होते. त्यावेळी बीना दासने गव्हर्नर स्टॅनले जॅक्सनवर गोळी झाडली. गव्हर्नर वाचला, पण बीना दासला अटक झाली व तिच्यावर खटला भरण्यात आला. याशिवाय पंजाब प्रांतातील लाडोराणी झुत्सी, पार्वतीदेवी व दुर्गादेवी यांचाही क्रांतिकारी चळवळीत सहभाग होता.

महात्मा गांधीजीनी इ.स. १९४२ मध्ये ब्रिटिशांविरोधी चले जाव चळवळ सुरु केली. चले जाव चळवळीमधील महिलांची

कामगिरी सुवर्णाक्षरात लिहावी इतकी मोलाची ठरली. महात्मा गांधीजीच्या 'करेंगे या मरेंगे' या आवाहनाला उत्स्फूतपणे प्रतिसाद देत हजारो महिला स्वातंत्र्य चळवळीत उतरल्या. हजारो महिलांनी हसतमुखाने कारावास पत्करला चले जाव चळवळीमध्ये अरुणा असफअली, सुचेता कृपलानी व उषा मेहता या महिलांनी अत्यंत धाडसी कामे केली. चले जाव चळवळीमध्ये महिलांनी स्वत:ला अटक करुन घेण्यापेक्षा भुमिगत राहून कार्य करण्यावर भर होता. ब्रिटिशाविरुध्द जनमत भडकविणारी पत्रके छापणे, ती जनतेपर्यंत पोचविणे, गुप्तपणे रेडिओ चालविणे, भुमिगत चळवळीच्या व घातपाती घटनांच्या बातम्या वृत्तपत्रापर्यंत पोचविणे अशी कामे महिलांनी केली. मुंबईमध्ये भुमिगत आकाशवाणी केंद्राचे संयोजन करण्यामध्ये उषा मेहताही होत्या. अरुणा असफअली या डॉ. राममनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण व अच्युतराव पटवर्धन यांच्याबरोबर देशभर फिरत जनतेमधील चैतन्य कायम टिकवित होत्या. भुमिगत राहून 'इन्किलाब' पत्रकाच्या मुद्रकाचे कार्य चालवित होत्या. इ.स. १९४२ पासून त्यांच्याविरुध्द पकड वारंट काढला होता. तरीही इ.स.१९४६ पर्यंत त्या भुमिगत राहून कार्य करित राहिल्या. १८ फेब्रुवारी १९४६ च्या 'ट्रिब्युनू' मधील लेखात अरुणा असफअली यांचा ''१८५७ च्या स्वतंत्र्य संग्रामात राणी लक्ष्मीबाईला जे स्थान आहे ते इ.स.१९४२ च्या चले जाव चळवळीत अरुण असफअली यांना आहे''. अशा शब्दात गौरव केला होता. चले जाव चळवळीमध्ये उषा मेहता, सुचेता कृपलानी व अरुणा असफअली यांनी जे कार्य चालविले होते. त्यामुळे ब्रिटिश अधिकाऱ्यांची चांगलीच दमछाक झाली होती.

याशिवाय दुसऱ्या महायुध्दादरम्यान सुभाषचंद्र बोस यांनी जपानच्या मदतीने ब्रिटिशापासून भारताला स्वतंत्र करण्यासाठी आझाद हिन्द सेनेच्या माध्यमातून प्रयत्न सुरु केले होते त्यावेळी आझाद हिन्द सेनेतील महिला पथकाचे नेतृत्व कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन यांनी केले होते.

**भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचा इतर क्षेत्रातील सहभाग**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत वरील प्रमुख लढ्याशिवाय भारतीय महिला इतर क्षेत्रातही आघाडीवर होत्या. इ.स.१९२१ पासून महिला विधिमंडळाच्या निवडणुकाही लढवू लागल्या होत्या. कमलादेवी चट्टोपाध्याय या असेंब्लीची निवडणूक लढविणाऱ्या पहिल्या महिला होय. इ.स. १९२२ मध्ये मुंबई महानगरपालिकेने महिलांचा मताधिकार व निवडणूक लढविण्याचा अधिकार मान्य केला. पुढे या कायदयानुसार झालेल्या निवडणूकीत सरोजिनी नायडू, बचूबेन लोट्वाला, हँडगिव्हसन आणि अवंतिकाबाई गोखले या महिला निवडून आल्या यापैकी अवंतिकाबाई गोखले यांची निवड काही तांत्रिक कारण्यामुळे रद्द झाली होती परंतु जनतेचा असलेल्या प्रचंड पाठिंबा व त्यांचे सामाजिक कार्य विचारात घेऊन १ एप्रिल १९२३ रोजी अवंतिकाबाई गोखले यांचा स्वीकृत सदस्य म्हणून मुंबई महानगरपालिकने स्वीकार केला होता. इ.स. १९३१ ते १९३२ या कालावधी पाहावे त्या मुंबई महानगरपालिकेत स्वीकृत सदस्या म्हणून कार्यरत होत्या. अवंतिकाबाई गोखले यांनी याकाळात आरोग्य व शिक्षण ही दोन खाती सांभाळली होती आरोग्यला हानीकारक पदार्थ विकले जावू नयेत, चौपाटीवर बसून हवा खावी पण पदार्थ खाऊन कागद टाकून वाळू खराब करु नये असा ठराव त्यांनी याकाळात मांडला होता. त्याचबरोबर मुंबई महानगरपालिकेच्या दवाखान्यात महिलांची वैद्यकीय तपासणी व उपचाराची सोय त्यांनी करुन घेतली तिथे स्त्रीरोग तज्ञांची नेमणूक केली इ.स. १९२४ मध्ये मुंबई महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी डॉ. गोपाळराव देशमुख यांच्याबरोबर अवंतिकाबाई गोखले यांचे नाव पुढे आले होते. परंतु अवंतिकाबााई गोखले यांना डॉ. गोपाळराव देशमुख यांचेच नाव महापौर पदासाठी योग्य वाटले म्हणून त्यांनी आपण या पदासाठी योग्य नसल्याचे स्पष्ट केले. अन्यथा अवंतिकाबाई गोखले मुंबई महानगरपालिकेच्या पहिल्या महिला महापौर झाल्या असत्या. अवंतिकाबाई गोखले यांची कामावरील निष्ठा, प्रामाणिकपणा व विचारांची स्पष्टता वाखाणण्यासारखी होती. त्या सभागृहात नियमितपणे हजर राहत असत. अवंतिकाबाईमुळे सभागृहातील चर्चेचे वातावरण व पातळी उंच राहत असे. अवंतिकाबाई गोखले यांचे काम लक्षात घेऊनच त्यांच्या घरासमोरुन जाणाऱ्या रस्त्याला 'अवंतिकाबाई गोखले रोड' हे नाव मुंबई महानगरपालिकेने दिले आहे.

याशिवाय मद्रास प्रांतात मुथुलक्ष्मी रेड्डी यांना कौन्सिलमध्ये घेण्यात आले होते. इ.स. १९३७ च्या निवडणूकीमध्ये सर्व प्रांतात मिळून ८० महिला असेंब्लीवर निवडून आल्या होत्या. त्यापैकी मध्य प्रदेशात अनुसयाबाई काळे, सिंधमध्ये सिप्पी मिलानी, संयुक्त प्रांतात श्रीमती रसूल या महिलांनी उपसभापतीपद मिळाले होते. मुंबईमध्ये हंसा मेहता तर पंजाबमध्ये बेगम शाहनाज या महिला शासकीय सचिवा बनल्या होत्या. संयुक्त प्रांतामध्ये विजयालक्ष्मी पंडित मंत्री झाल्या होत्या. इ.स. १९४० मध्ये कायदेमंडळात इतक्या महिला असणारा भारत हा जगातील एकमेव देश होता. इ.स.१९४६-४७ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रतिनिधीत्व विजयालक्ष्मी पंडित यांनी केले होते.

एकुणच भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महिलांचा सहभाग होता. आणि तो सक्रीय सहभाग होता हे वरील विवेचनावरुन लक्षात येते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीमधील महिलांच्या या सक्रीय सहभागबाबत अनेक मान्यवरांनी गौरवपूर्ण उद्गार काढले आहेत. श्रीमती ग्रे यांनी म्हटले आहे की,''परकीय शासकाकडून होणारे अमानुष अत्याचार व जुलूम सहन करुनही काँग्रेसच्या ध्वजाखाली भारतीय महिलांनी न डगमगता केलेली कार्य मौलिक होते.'' भारतीय महिलांचा भारतीय चळवळीतील सहभागबाबत व्हॅलेंटाईन चिरोल यांनी 'द इंडियन अनरेस्ट' या ग्रंथात म्हटले आहे की,''भारतातील जहाल राष्ट्रवादाच्या प्रसाराला हिन्दु महिला चालना देत आहेत . ब्रिटिश महिला समाजात स्वतंत्रपणे वावरत असली तरी तिच्यापेक्षा चार भिंतीआड राहणारी भारतीय महिला आपल्या पतीला व मुलांना किती तरी अधिक प्रभावित करते.'' थोडक्यात भारतीय महिलांचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या वेगवेगळ्या टप्पाने सक्रीय सहभाग होता हे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**


| | |
|---|---|
| १. आधुनिक भारताचा इतिहास (१९२१ – १९४७) | डॉ. वैद्य सुमन व<br>डॉ. शांता कोठेकर |
| २. आजकालचा भारत | रजनी पामदत्त<br>अनु. देवधर य. ना. |
| ३. अर्वाचीन भारताचा इतिहास | प्रा. देशपांडे सुधाकर |
| ४. कथा स्वातंत्र्याची | केतकर कुमार |
| ५. स्वातंत्र्याचा लढा | बिपीन चंद्र |
| ६.आधुनिक भारत | आचार्य जावडेकर श.द. |




**तुकाराम नारायण शिंदे**
इतिहास विभाग , अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालय,सोलापूर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org